सकाळ

# लोकेशन शेअर करणे धोकादायक ठरू शकते

## जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर, सायबर सुरक्षा जागरूकता मोहीम

**भंडारा, ता. ६ :** आपल्या मोबाईलमधील कुठल्याही ॲपला परमिशन देताना दोनदा विचार करावा. कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता इंटरनेट आणि विविध टेक्नॉलॉजिचा जबाबदारीपूर्वक वापर करावा. विद्यार्थ्यांनी कुठल्याही खासगी गोष्टी, फोटो अथवा लोकेशन कोणालाही शेअर करू नये. त्याचप्रमाणे चॅटिंग करतानासुद्धा मर्यादा पाळणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी अशा गोष्टी टाळायला हव्यात, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर यांनी केले. शनिवारी (ता. पाच) जे. एम. पटेल कॉलेजमध्ये सायबर सुरक्षेच्या जनजागृतीसाठी कार्यक्रम झाला.यावेळी ते बोलत होते. त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक उदाहरणे देत सायबर गुन्ह्यांबाबत अवगत केले. यात गुन्ह्याचे स्वरूप, त्याची कारणे, परिस्थिती, व्याप्ती याबाबत जाणिव करून दिली.

प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या कार्यक्रमा मुख्य अतिथी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश राजेश अस्मर होते. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव बिजू गवारे प्रामुख्याने उपस्थित होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव बिजू गवारे यांनी विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे आणि सायबर गुन्हा घडलाच तर संकोच न करता सायबर पोलिस स्टेशनमध्ये संपूर्ण माहिती द्यावी असे आवाहन केले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ विकास ढोमणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात नुकत्याच घडलेल्या वर्धमान ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे श्री. ओसवाल यांच्यासोबत घडलेल्या सायबर गुन्ह्याची सविस्तर माहिती दिली. त्याचसोबत इस्राईल-लेबनान युद्धामध्ये होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या वापराची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, तंत्रज्ञानाच्या वापरासोबतच सायबर सुरक्षा काळजी गरज असून विद्यार्थ्यांनी याचे ज्ञान घेणे आवश्यक आहे.



भंडारा : कार्यक्रमात मार्गदर्शन करताना जिल्हा प्रमुख न्या. राजेश अस्मर.

याप्रसंगी सायबर पोलिस स्टेशनचे हवालदार दिनेंद्र आंबेडारे, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाच्या सायबर योद्ध्यांनी नृत्याविष्कारातून सोशल मीडिया आपल्याला कशाप्रकारे बंदिस्त करतो आणि त्यापासून आपण स्वतःचे संरक्षण कसे करू शकतो हे पटवून दिले. तसेच कव्वालीद्वारे विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवाण्याची माहिती दिली. याप्रसंगी सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची शपथ दिली.हा उपक्रम प्राचार्य डॉ. विकास ढोमणे यांच्या मार्गदर्शनात डॉ. कार्तिक पनीकर, डॉ. प्रविण घोसेकर, डॉ. सबाह नसीम, पलाश फेंडेवार, प्रियंका शर्मा, फरीना शेख यांनी सहकार्य केले.